International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 7 No. 35 March – April - 2026

# मराठी लोककथांचे लोकसाहित्यातील महत्त्व: एक नवदृष्टीकोन

**प्रा. डॉ. द. के. गंधारे**
*मराठी विभाग, अॅड्. एम. एन. देशमुख, महाविद्यालय, राजूर,ता. अकोले. जि. अहिल्यानगर.*
*Corresponding Author – प्रा. डॉ. द. के. गंधारे*
DOI - 10.5281/zenodo.20485982

## प्रास्ताविक

मराठी लोककथांकडे केवळ मनोरंजनाचे साधन म्हणून न पाहता त्याकडे सामाजिक दस्तऐवज म्हणून पाहिले पाहिजे. लोकसाहित्याला आदि काळापासुनची परंपरा आहे. लोकसाहित्याला वेगवेगळया कालखंडात लोकजीवन विशेषांचे संदर्भ लाभलेले असल्यामुळे विविध ज्ञानशाखांच्या अभ्यासात, अभ्यासाची साम्रगी म्हणून लोकसाहित्याला वेगळे महत्त्व आहे. साहित्याच्या अभ्यासासाठी व सामाजिक शास्त्रांच्या अध्ययनासाठी लोकसाहित्याच्या अभ्यासाची उपयुक्तता सर्वमान्य झाली आहे.

लोकसाहित्यात लोकविश्वास, लोकश्रध्दा, लोकसमजुती, लोकभ्रम, लोककला, लोकविधी, मौखिक रूपातील शब्दाविष्कार इत्यादींचा समावेश होतो. लोकमानसाचे विविध वाड;मयीन सांस्कृतिक व कलात्मक आविष्कार म्हणजे लोकसाहित्य होय. Folkore या अर्थी मराठी ‘लोकसाहित्य’ वा ‘लोकविद्या’ या संज्ञा रूढार्थाने वापरल्या जातात. Folkore ही संज्ञा विल्यम जोन्स टॉमस या इंग्रज पुरातत्वज्ञाने 1846 मध्ये वापरली व ती जगभर रूढ झाली.

महाराष्ट्रात लोकसाहित्याची मांडणी 1858 पासून सुरू झाली तरी, खऱ्या अर्थाने इ.स.1915 पासुन त्याचा अभ्यास होऊ लागला. 1920 साली वि.का. राजवडे यांनी ‘लोकगीत’ हा पारिभाषिक शब्द वापरला आणि ‘सज्जनगडावरचे एक लोकगीत’ या लेखात लोकगीताची लक्षणे विशद केली. पुढे 1930 मध्ये शं. गो. दाते यांनी ‘लोककथा’ नावाचे पुस्तक प्रकाशित केले. लोकसाहित्यातून समाजाच्या आवडीनिवडी त्यांच्या आशाआकांक्षा चित्रीत झालेल्या असतात. अशा लोकसाहित्यात लोकगीते, लोककथागीते, लोककथा, लोकनाटय, उखाणे, म्हणी,वाक्संप्रदाय यांचा समावेश होतो.

## लोकसाहित्य म्हणजे काय?

लोकसाहित्याचा विचार करता लोक आणि साहित्य हे दोन शब्द एकत्र येऊन लोकसाहित्य हा सामासिक शब्द तयार झालेला आहे. रूढी व परंपरा या नुसार आलेली लोकांची जीवन पध्दती म्हणजे लोकसाहित्य होय. लोकसाहित्य हे एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे बद्ल होऊन जात असतो. लोकसाहित्यातील कथा, गीते, म्हणी, वाक्प्रचार, संकेत, लोकाचार याचा कर्ता एकच एक नसतो. ‘‘आदिम काळापासून रूढ असलेल्या समजुती, पारंपरिक कथा, लोककथा गीते, विधीविधाने, उत्सव, निरनिराळे खेळ, जादूटोणा, ज्योतिष, परंपरेने चालत आलेल्या क्रिया, तोटके, भ्रम, लोकोक्ती इत्यादींचा समावेश लोकसाहित्यात होतो.’’[1]

याच बरोबर लोकसाहित्याचे अभ्यासक अलेक्झांडर क्राप यांनी आपल्या The Science of Folkore या ग्रंथात लोकसाहित्यात लोकजीवनातील कोणकोणत्या घटकांचा समावेश होतो. याची विस्तृत यादी दिली आहे. ''त्यात वनस्पती, प्राणी, नक्षत्र, खनिजविद्या, लोकभ्रम, विधीविशेष, जादूटोणा, लोकविश्वास, परीकथा, प्राणीकथा, रंजककथा, स्थानिककथा, वीरकथा, लोकगीते, कोडी, म्हणी, लोकनाटय, लोकनृत्य इत्यादींचा समावेश होतो.''[2]

लोकसाहित्याची निर्मिती ही समुह निर्मिती असते. एखादे गीत वा कथा व्यक्तिनिर्मित असली तरी त्यामागची प्रेरणा ही समुहाचीच असते. एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे ते संक्रमित होते. देशकाल परिस्थितीनूसार त्यात बदलही होतो. पण तो बदल हा समुहप्रेरित व समुहस्वीकृत असतो. ''लोकवाङ;मय ही शिक्षित तसेच अशिक्षित अशा दोन्ही प्रकारच्या समाजाची परंपरागत मौखिक संपत्ती असते. त्यातून लोकसंस्कृतीच्या विशेषांचे जसे दर्शन घडते, त्याच प्रमाणे लोकप्रतिमेचा आविष्कारही दिसून येतो.''[3]

भारतीय लोकसाहित्याला प्राचीन व समृध्द अशी वैविध्यपूर्ण परंपरा आहे. या लोकसाहित्याची मुळे प्राचीन वैदिक वाङ;मयात आढळतात. व्यक्तीच्या जन्मापासून ते अंत्यविधी पर्यंतचे धर्मविधी, गायिली जाणारी गाणी सर्व भाषात प्रचलित आहेत. मृत्युप्रसंगी म्हणावयाची सुक्ते ऋग्वेदात आढळतात. भारतातल्या निरनिराळया प्रदेशातल्या लोकवाङ;मयात साधारण हर-गौरी(शिव-पार्वती), राधा-कृष्ण, राम-सीता हे विषय आलेले दिसतात. लोकसाहित्याची सरोजनी बाबर, वि.का. राजवाडे, दुर्गा भागवत, रा.चिं. ढेरे, गं.ना. मोरजे, प्रभाकर मांडे, शरद व्यवहारे, तारा भवाळकर, मधुकर वाकोडे, अशा अनेक अभ्यासकांनी सुत्रबध्द मांडणी केलेली आहे.

**मराठी लोककथांचे महत्त्व:**

लोकसाहित्यात लोककथांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. मौखिक परंपरेतून चालत आलेल्या या कथांमधून मानवी स्वभाव, नीतिमत्ता आणि तत्कालीन समाजव्यवस्थेचे दर्शन घडते.

सृष्टीमध्ये घडणाऱ्या विविध घटनांचे स्पष्टीकरण करण्याची प्रेरणा लोकथांच्या मूळाशी असते.निसर्ग आणि संस्कृती यांचे स्वरूप स्पष्ट करणे आणि त्यांच्या विकासावर भाष्य करणे ही लोककथांच्या उत्पत्तीमागील प्रमुख प्रेरणा आहे.''मौखिक पंरपरेने लोकजीवनात प्रचलित असलेल्या कथा म्हणजे लोककथा'' लोककथा मौखिक परंपरेने एका पिढीपासून दुसऱ्या पिढीपर्यंत चालत राहिल्याने समाजमनाशी त्या एकरूप झाल्या. सृष्टीमध्ये ज्या विविध घटना घडतात त्या घटनांचेच प्रतीकात्मक स्वरूपात लोककथात चित्रण केलेले असते.दैवतकथातून निसर्गाचे विविध प्रतीके असतात.सृष्टीतील प्रतीकीकरणातून लोककथांची निर्मिती झाली आहे असे मानले जाते.निसर्ग आणि संस्कृती यांचे स्वरूप स्पष्ट करणे त्यांच्या विकासावर भाष्य करणे ही लोककथांच्या उत्पत्तीमागील प्रमुख प्रेरणा असल्याचे अभ्यासकांनी म्हटले आहे.

**लोककथा परंपरा व वर्गीकरण:**

भारतात फार पूर्वीपासून कथा आणि आख्याने यांना ग्रंथरूपाने जतन करून ठेवण्याची प्रथा आहे.त्यात बृहदकथा, जातककथा, यांना अधिक महत्त्व आहे. लोककथांचे वर्गीकरण लोककथा, पराक्रमकथा, दंतकथा, प्राणिकथा, रूपककथा, व्रतकथा, गीतकथा, नीतिकथा, हास्यकथा,परीकथा,अनुभवकथा, स्वरूपात करता येते. स्थळ, पुरलेले धन, देवतासंबंधी कथा, भूमीगत द्रव्य कथा, नदी, पर्वत,डोंगर याविषयी कथा यात येतात. अकोले

तालुक्यातील कळसूबाई, कौठवाडीचा कठा याही दंतकथा प्रसिध्द आहेत.

लोककथांच्या निर्मितीविषयी डॉ. सत्येंद्र लिहितात, ''आकाशातील चंद्र-सूर्य-तारे, सृष्टीतील नद्या, डोंगर, पर्वत, निसर्गातील अनेक चमत्कार,विविध ऋतु, ऊन, पाऊस, वारा,आदिविषयी त्यांच्या मनात कुतुहल होते.त्यांच्या या संदर्भात अनेक प्रश्न होते.या प्रश्नांच्या उत्तरातून निसर्गातील दृश्यांच्या स्पष्टीकरणातून लोककथांची प्रारंभीची अवस्था पाहावयास मिळते.''[4] वर्गीकरणाचा विचार करता आशय आणि रचना या दृष्टीने लोककथांचे वर्गीकरण झालेले आहे.

रचनेच्या दृष्टीने कथा,आख्यायिका,गीतकथा,व कहाणी असेही लोककथांचे वर्गीकरण करता येते. शरद व्यवहारे यांनी लोककथेचे ''दैवतकथा, अद्भूतकथा, दंतकथा, नीतिकथा, हास्यकथा, व्रतवैकल्याच्या कथा''[5] लोककथा हा प्राचीन वाङ्मय प्रकार आहे. लोककथेच्या संदर्भात इंदुमती शेवडे लिहितात, ''कथनाची आणि निवेदनाची आवड ही माणसांची उपजत प्रवृत्ती, विचार प्रकट करण्यासाठी भाषेचे साधन प्राप्त होताच मानवाने गोष्टी सांगण्यास सुरूवात केली. या वर्गीकरणातून दंतकथा किंवा आख्यायिका यांचे स्वरूप बघता येईल.''[6] लोककथेच्या संदर्भात अनेक अभ्यासकांनी वेगवेगळी मते मांडलेली आहेत. प्रत्येक लोकसमूहाच्या कथा म्हणजे त्या त्या विशिष्ट लोकसमूहाची किंवा राष्ट्राची आत्मकथाच होय असे मानववंशशास्त्रज्ञ फ्रांझ बोआस यांनी म्हटले आहे.

**लोककथांच्या अभ्यासातील व नवदृष्टीकोन:**

पारंपरिक पध्दतीने लोककथांचा अभ्यास हा केवळ भाषिक अंगान केला जातो. परंतु नवदृष्टीकोनातून अभ्यास करतांना स्त्रीवादी, पर्यावरण, सामाजिक व मानस

शास्त्रीय अंगाने विश्लेषणाची मांडणी करता येतेसमाजात मौखिक परंपरेने चालत आलेली कथा जी एखाद्या ऐतिहासिक घटनेवर आधारित असते पण मौखिक परंपरेत या कथेचे स्वरूप पूर्णपणे बदललेले असते तिला दंतकथा किंवा आख्यायिका असे म्हणतात.याविषयी दुर्गा भागवत लिहितात, ''जेथे कत्र्याच्या वंशाची प्रशंसा गद्याने विस्तारापूर्वक सांगितली जाते, कत्र्याच्या मुखाने किंवा अन्य मुखाने जिथे कथेचे कथन होते, तिला आख्यायिका म्हणावे''[7] लोककथाचा प्राचीन ग्रंथ गुणाढयाची बृहत्कथा हा होय. अशा दंतकथांना आख्यायिका असेही म्हटले जाते. यात इतिहास आणि कल्पना यांचे मिश्रण असते. विक्रमादित्य आणि आल्हा-ऊदल या कथा या स्वरूपाच्या आहेत. इतिहासातील थोर व्यक्ती, प्राचीन नगरे,तीर्थस्थाने यांची महती दंतकथातून मिळते. पारंपरिक गोष्ट म्हणजे आख्यायिका अशी दंतकथेची व्याख्या करता येईल. अलौकिक व्यक्तीविषयी लोकसमूहास वाटणारा आदर व अभिप्राय अद्भूताच्या संदर्भात व्यक्त होत असतो.

लोककथांमधील स्त्री पात्रांचे चित्रण केवळ पीडित त्यागी या अंगाने न पाहता त्यांच्यातील निर्णयक्षमता आणि संघर्षाचा अभ्यास महत्त्वाचा ठरतो. तसेच पर्यावरणीय अंगाने विचार करता लोकथात पर्यावरणाला दैवी रूप मानले आहे. त्याबरोबरच निसर्ग संवर्धनाच्या अंगाने विचार अभिप्रत आहे. तसेच सामाजिक बंध लोकथांमधून दिसतो वेगळया अंगाने करता येईल. मराठी लोककथा या केवळ जुन्या गोष्टी नसूनत्या वर्तमानातील सामाजिक प्रश्नांची उकल करण्यासाठी उपयुक्त ठरू शकतात. त्यांच्याकडे चिकित्सक व आधुनिक दृष्टीने पाहिल्यास लोकसाहित्याचा ठेवा अधिक समृध्द होईल.

**संदर्भसूची:**


1. दुर्गा भागवत, ‘‘लोकसाहित्याची रूपरेषा’’ पृष्ठ - 26-27.
2. Dr.Krappe Alexander, The Science of Folkore, Page- 37
3. विजया राजाध्यक्ष, ‘‘मराठी वाड;मयकोश’’ खंड चौथा, समीक्षा संज्ञा, मुंबई -पृष्ठ - 304.
4. डॉ.. सत्येंद्र,लोकसाहित्य विज्ञान, पृष्ठ 203
5. शरद व्यवहारे, लोकसाहित्यः संकल्पना आणि स्वरूप,कैलाश पब्लिकेशन,औरंगाबाद1999 पृ.175
6. डॉ. इंदुमती शेवडे मराठी कथा उगम आणि विकास पृ.7
7. उनि दुर्गा भागवत, पृष्ठ. 105